

# MAHILA MAHAVIDYALAYA

## A M R A V A T I

opp. SBI Main Branch, Jog Chowk, Amravati.
Telephone : 0721- 2571115
e-mail : mahilamahavidyalaya.amt@gmail.com website : www.mmv.ac.in

# AQAR 2022-23

# Criterion VI

## GOVERNANCE, LEADERSHIP AND MANAGEMENT

**6.2.2 : The functioning of the institutional bodies is effective and efficient as visible from policies, administrative setup, appointment and service rules, procedures etc.**

**College Development Committee – Constitution, Minutes**

Submitted to

NAAC

**THE NATIONAL ASESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

महिला महाविद्यालय, अमरावती.
महाविद्यालयीन विकास समिती सभा.
दिनांक : 15·04·2023
स्थळ : महिला महाविद्यालय अमरावती.

महिला महाविद्यालय अमरावती येथील - महाविद्यालयीन विकास समितीची सभा सत्र : 2022-23 मधील सभा, दि. 15·04·2023 रोजी, सकाळी 10:00 वा. महाविद्यालयात आयोजित करण्यात आली.
सभेला खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

: स्वाक्षरी :

01) मा. डॉ. माया वि. शिरभाळकर
मा. अध्यक्ष : न्यू. वि. शि. मंडळ, अमरावती. — [signature]

02) मा. डॉ. सुभाष द. कसबेकर.
मा. ज्येष्ठ उपाध्यक्ष : न्यू. वि. शि. मं. अम... — [signature]

03) मा. पं. किशोर वि. नवसाळकर.
मा. उपाध्यक्ष : न्यू. वि. शि. मं. अम... — [signature]

04) मा. प्रो. विश्वनाथ दि. जोशी. (आमंत्रित)
मा. उपाध्यक्ष : न्यू. वि. शि. मं. अम... — ........

05) मा. प्रा. श्री. निनाद वा. सोमण.
मा. सचिव : न्यू. वि. शि. मं. अम... — [signature]

06) मा. श्री. रविंद्र ग. खांडेकर.
मा. मंडळ प्रतिनिधी : न्यू. वि. शि. मं. अम... — [signature]

07) मा. प्रा. डॉ. विनया कांत.
मा. प्रतिनिधी (माजी विद्यार्थिनी) म. म. वि. अम... — [signature]

08) मा. प्रा. सचिन देशमुख.
मा. सदस्य : म. म. वि. अम... — [signature]

०९) मा. प्रा. बी. बी. वासनिक ...... Bulasnik
मा. शिक्षक प्रतिनिधी: म.म.वि. अम...

१०) मा. प्रा. डॉ. अंकुश एन. गिरी. ......
मा. शिक्षक प्रतिनिधी: म.म.वि. अम...

११) मा. प्रा. डॉ. पल्लवी एस. आंभोरे ......
मा. शिक्षक प्रतिनिधी: म.म.वि. अम...

१२) श्री. मिलींद पंत. ...... M Pant
शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी: म.म.वि. अम...

१३) कु. प्रिती पांडे. ......
विद्यार्थी प्रतिनिधी: म.म.वि. अम...

१४) कु. निकीता मोने. ......
विद्यार्थी प्रतिनिधी: म.म.वि. अम...

१५) मा. प्राचार्य, डॉ. अविनाश आ. मोहरील. ......
मा. सदस्य/मा. सचिव, महाविद्यालयीन —
विकास समिती, म.म.वि. अमरावती.

" महाविद्यालयीन विकास समिती सभा."

दि. 15/04/2023

~ इतिवृत्त ~

3

महिला महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन विकास समितीच्या दि. 15/04/2023 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.

महिला महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन विकास समितीची सभा दि. 15/04/2023 रोजी सकाळी 10.00 वाजता प्राचार्य कक्षात आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्ष डॉ. माया शिराळकर होत्या. प्राचार्यांनी अध्यक्षांचे तसेच उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेची कार्यवाही सुरू केली.

विषय क्र. 01 :- दि. 18/07/2022 रोजी झालेल्या महाविद्यालयीन विकास समितीचे इतिवृत्त वाचून मंजुर करणे.

ठराव :- महाविद्यालयीन विकास समितीच्या दि. 18/07/2022 रोजी आयोजित करण्यात आलेले सभेचे इतिवृत्त प्राचार्यांनी सभेत सादर केले या इतिवृत्तात शैक्षणिक सत्र 2022-2023 च्या अंदाज पत्रकाच्या विवरणामध्ये खाते निहाय जमा खर्चाचा तपशील समाविष्ट करावा अशी सूचना संस्थेचे सचिव श्री. निनाद सोमण यांनी केली. सूचनेनुसार आवश्यक बदल केले जातील असे प्राचार्यांनी सांगितले. इतिवृत्ता मध्ये इतर सर्व बाबी योग्य पद्धतीने नोंदविल्या असल्यामुळे सदर इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र. 02 :- मागील सभेच्या निर्णयावरील कार्यपालन अहवालास मंजुरी प्रदान करणे,

ठराव :- दि. 18/07/2022 रोजी झालेल्या सभेतील निर्णया वरील कार्यपालन अहवाल प्राचार्यांनी सभेपुढे सादर केला, सदर कार्यपालनाबाबत सर्व सभासदांनी सविस्तर चर्चा केली व कार्यपालना संदर्भात समाधान व्यक्त केले. प्राचार्यांनी संपूर्ण कार्यकारीणीच्या पाठबळामुळे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केलेल्या परिश्रमामुळे सोबतच विद्यार्थीनी, माजी विद्यार्थीनी व पालकांनी केलेल्या सहकार्यामुळे महाविद्यालयाला 2.98 CGPA सह B++ हा ग्रेड प्राप्त झाला, त्या करीता प्राचार्यांनी सर्वांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवला ज्यास सर्वांनी समर्थन दिले. मंडळ प्रतिनिधी प्रा. रविंद्र खांडेकर यांनी

प्राचार्य तसेच IQAC coordinator प्रा. सचिन देशमुख यांचे संस्थेच्या वतीने विशेष कौतुक केले. सविस्तर चर्चे नंतर कार्यपालन अहवालास मंजुरी प्रदान करण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र 03 :- आर्थिक वर्ष 2023-2024 च्या अंदाज पत्रकास मंजुरी प्रदान करणे.

ठराव :- प्राचार्यांनी आर्थिक वर्ष 2023-2024 चे अंदाज पत्रक सभेपुढे सादर केले. सदर अंदाज पत्रकामध्ये महाविद्यालयात असलेल्या विविध खात्यांमध्ये जमा खर्चाचे अंदाजे विवरण मांडण्यात आले. सदर अंदाज पत्रक तयार करतांना महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशीत होणाऱ्या विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या गृहीत धरून जमा रक्कम दाखविण्यात आली आहे असे प्राचार्यांनी सांगितले. या अंदाज पत्रकाच्या खाते निहाय जमा खर्चाचे तसेच एकूण जमा खर्चाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| Receipt Amount | Expenses | profit / Dificit |
|---|---|---|
| Account Name | Sr. College Non salary (Grant in Aid) | |
| 1312,407/- | 18,45,388/- | -5,32981/- |
| Account Name | Jr. Colleg Non salary (Grant in Aid. | |
| 11,86,516/- | 10,25,600/- | + 1,60,916/ |
| Account Name | Computer course fee | |
| 376735/- | 3,81,000/- | -4265/- |
| Account Name | Vocational course (Jr College) | |
| 451948/- | 750000/- | -298052/ |

Novelty

| Receipt Amount | Expenses | Profit/Deficit |
|---|---|---|
| Account Name | Post Graduate, M.Com, M.A(H.Eco & Music) | |
| 1386,403/- | 1198000/- | +188,403/- |
| Account Name | Sr. College Non Grant courses | |
| 1945,504/- | 1927,800/- | +17,704/- |
| Account Name | Development Fund | |
| 308000/- | 2,90,000/- | + 18000/- |
| Account Name | MMV UGC | |
| 341,985/- | 4500/- | +337,485/- |
| Account Name | MMV Research centre | |
| 4,39,239/- | 332,000/- | +107,239/- |
| Account Name | MMV Alumini Association | |
| 147,584/- | 37,500/- | +110,084/- |
| Account Name | MMV B.Voc. | |
| 645,910/- | 6,21,000/- | +24,910/- |

## Total Summary

| | |
|---|---|
| Total Receipt | 8198631/- |
| Total Expense Expected | 8385788/- |
| Deficit | -187157/- |

आर्थिक वर्ष 2023-2024 चे अंदाजपत्रक तयार करतांना महाविद्यालयाचे Accountant श्री. अनिरुद्ध कराडे यांनी परिश्रम घेतले तसेच संस्थेचे सचिव श्री. निनाद सोमण यांनी वेगवेगळ्या बाबतीत भरपूर मार्गदर्शन केल्यामुळे सदर अंदाज पत्रक चांगल्या प्रकारे बनविले आले असे प्राचार्यांनी सभेत सांगितले. अंदाजपत्रकाच्या काही खात्यांमध्ये खर्चाच्या रकमेची विभागणी करण्यात यावी अशी सूचना करण्यात आली सूचने नुसार आवश्यक ते बदल करून आर्थिक वर्ष 2023-2024 करीता सादर करण्यात आलेले अंदाजपत्रक सर्वानुमते मंजुर करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र 04:- आकस्मिक उद्भवलेल्या व नजीकच्या काळात केल्या जाणाऱ्या प्रस्तावित खर्चांना मंजुरी प्रदान करणे.

ठराव:- प्राचार्यांनी सभेमध्ये आकस्मिक उद्भवलेल्या, थकित राहिलेल्या तसेच नजिकच्या काळात केल्या जाणाऱ्या प्रस्तावित खर्चाचे विवरण सादर केले. सदर खर्चाला मंजुरी प्रदान करण्यास यावी अशी विनंती सभेला केली.

विवरण खालील प्रमाणे

| अ.क्र | विवरण | रुपये |
|---|---|---|
| 1] | Dot com Infotech Pvt. Ltd [एकूण 10 GB डेटा तसेच वेबसाईट होस्टिंग चार्जेस एकूण खर्च] | 38940/- |
| 2] | ग्रंथालया मध्ये घेण्यात आलेल्या क्रमित पुस्तके व अन्य पुस्तक खरेदी. | 7,307/- |
| 3] | जाहिरात खर्च (CHB प्राध्यापक तसेच Non Grant वरील प्राध्यापक यांच्या जाहिरातीच्या खर्च दै. हिंदुस्थान) | 22,049/- |
| 4] | रूम नं. 9 च्या वर कोबा पद्धतीने फ्लोरिंग करण्याचा खर्च अंदाजे. | 1,00,000/- |

संस्थेच्या मा. अध्यक्ष तथा मा. सचिव यांच्या नावे प्राचार्यांच्या मार्फत करण्यात आली होती. यामध्ये त्यांनी जवळपास सर्व कर्मचाऱ्यांचा वारंवार अपमान करून, त्यांना अतिशय असभ्य भाषेमध्ये बोलुन, त्यांच्या पगाराच्या उल्लेख करून, शिवाय पुढील काळात मीच प्राचार्य राहणार असल्याने मी एकेकाला बघून घेईन, वैद्यकीय आपात्त स्थिती असताना देखील कर्मचाऱ्यांना महाविद्यालयात बोलावून प्रचंड मोठ्या प्रमाणात मानसिक छळ केल्या बद्दल लेखी तक्रार दिली असल्याचे प्राचार्यांनी सभेला सांगितले. या तक्रारी वर संस्थेच्या मा. सभासदांकडून त्यांना समज देखील देण्यात आली होती असे प्राचार्यांनी सभेला सांगितले. नॅक मुल्यांकनात त्यांच्या सीएचबी प्राध्यापकांना होणारा त्रास बघता त्यांना नॅक प्रक्रीये पासुन बाजुला ठेवण्यात आले व त्यामुळे प्रक्रीया योग्य रीतीने पार पडली. परंतु त्यानंतर त्यांनी विभाग प्रमुख पदाचा राजीनामा दिला व त्यांनी विभागाच्या कोणत्याही उपक्रमांमध्ये सहभागी होणे हेतुपुरस्पर टाळले. त्यांनी स्वतः तयार केलेला व्हॉट्स ॲप ग्रुप सोडला ज्यावर उपक्रमाच्या सूचना येत होत्या. जवळपास चार/पाच महिने त्यांनी या संदर्भात तो समुह जॉईन करण्याचे कोणतेही प्रयत्न केले नाही तसे पुरावे देखील सादर केले नाहित. महाविद्यालयाच्या मुख्य समुहावर प्राचार्यांनी स्वतः सूचना टाकून देखील त्या विभागाच्या अभ्यासपूरक कार्यक्रमात सहभागी झाल्या नाही व कार्यक्रमाच्या दिवशी प्राचार्य स्वतः उपक्रमात हजर असतांना महाविद्यालयात असुनही त्या उपस्थित राहिल्या नाही. यावरून त्यांना वरिष्ठांच्या आदेशाची पायमल्ली करणे, कर्तव्य कसूर करणे या करीता दोषी मानल्या जाऊ शकते असे प्राचार्यांनी सभेला सांगितले.

दि. 08/04/2023 व दि. 10/04/2023 रोजी परत महाविद्यालयातील बहुतांश कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थिनीने प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांच्या स्वचे चारीत्र्य हनन करणाऱ्या वक्तव्यां-संदर्भात लेखी तक्रार दिल्याचे प्राचार्यांनी सांगितले. ही अत्यंत गंभिर तक्रार करण्या मध्ये वरीष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच वाणिज्य विभागातील सीएचबी प्राध्यापक व कॉन्ट्रॅक्ट प्राध्यापक सोबतच एका विद्यार्थिनीचा सहभाग असल्याचे प्राचार्यांनी सभेला सांगितले. सदर तक्रार अत्यंत

| | | |
|---|---|---|
| 5] | एनर्जी ऑडिट, ग्रीन ऑडिट आणि Envirmental ऑडिट करून घेण्याचा खर्च | 20,000/- |
| 6] | महाविद्यालयात आकस्मिक उद्भवलेल्या खर्चाकरिता जसे<br>i] आकस्मिक यंत्र दुरूस्ती.<br>ii] आकस्मिक भौतिक सुविधा दुरूस्ती.<br>iii] विभागांकडून आयोजित केले जाणारे कार्यक्रम<br>iv] आकस्मिक वस्तु खरेदी.<br>v] छपाई खर्च,<br>vi] स्टेशनरी<br>vii] इतर किरकोळ खर्च | 1,00,000/- |
| 7] | नॅक मुल्यांकनाच्या भेटीच्या वेळी झालेल्या अतिरिक्त खर्चाची नॅक कडून मागणी (सदर मागणी संदर्भात नॅक बंगलोर कार्यालयाशी पत्र व्यवहार करून सदर रक्कम महाविद्यालयावर अतिरिक्त बोजा होत आहे. असे कळवावे असे ठरले. सदर विनंती मान्य न झाल्यास नोंदविलेल्या रकमेस सभेने मान्यता दिलेली आहे असे गृहीत धरण्यात येईल) | 45,734/- |

वरील सर्व खर्चांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यानंतर सर्वानुमते सर्व खर्चांना मंजुरी प्रदान करण्यात आली वरील सर्व खर्च योग्य विवरणासह अंतिम मंजुरी करीता न्यू. वि. शि. मंडळाच्या कार्यकारिणी कडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र. 5 :- प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांच्या संबंधी प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव :- महिला महाविद्यालय, अमरावती येथे वाणिज्य विभागात कार्यरत प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांच्या विरूद्ध महाविद्यालयातील बहुतांश कर्मचाऱ्यांनी एकत्रित पणे तक्रारी केलेल्या आहेत असे सभेचे सदस्य सचिव प्राचार्य (प्रभारी), महिला महाविद्यालय, अमरावती यांनी सभेला सांगितले. सदर तक्रारी अत्यंत गंभीर स्वरूपाच्या असुन या तक्रारी दि. 20/10/2022, दि. 08/04/2023 व दि. 10/04/2023 रोजी प्राप्त झाल्या असुन यामधील अत्यंत गंभीर स्वरूपाचे आरोप लक्षात घेता त्यांना याबद्दल कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आल्या. यासोबतच प्रा. डॉ. सुषमा देशमुख या वाणिज्य विभागाच्या अभ्यास पूरक कार्यक्रमा मध्ये जाणून बुजून सहभागी होत नसल्याने, वाणिज्य विभागाच्या कामकाजा करीता केलेला व्हॉट्स ॲप ग्रुप ज्यावर सर्व सूचना दिल्या जातात तो सोडून देणे, त्यानंतर प्राचार्यांनी स्वत: मुख्य ग्रुपवर सूचित केल्यानंतर देखील सदर ग्रुप जॉईन करुन घेण्याचा कोणताही प्रयत्न न करणे, विभागाच्या कार्यक्रमां मध्ये प्राचार्यांनी सूचना देऊनही सहभागी न होणे, महाविद्यालयात हजर असताना देखील विभागाच्या कार्यक्रमास अनुपस्थित राहणे या सारखी कर्तव्य कसूर केल्याबाबत देखील प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. या सर्व कारणे दाखवा नोटीशींची उत्तरे दिशाभूल करणारी, मुळ मुद्यावरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करणारी व कोणतेही पुरावे सोबत न जोडता प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांनी दिली. सदर उत्तरे समाधानकारक नसल्याने किंबहुना वस्तु-स्थिती पासुन विपरीत भाष्य करणारी असल्याने या सर्व तक्रारी बाबत महाविद्यालयीन विकास समितीच्या सभेमध्ये याबाबत चर्चा व निर्णय करण्या करीता विषय ठेवण्यात आला.

या विषयांतर्गत प्राचार्यांनी या तक्रारी बाबत सभेला अवगत केले. दि. 20/10/2022 रोजी महाविद्यालयातील अंदाजे 30 कर्मचाऱ्यानी, ज्यामध्ये वरीष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश होता. प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांच्या कडे महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाचा कार्यभार असतांना त्यांनी कर्मचाऱ्यांना दिलेल्या हिन वागणुकी संदर्भात आलेली तक्रार प्राचार्यांनी सादर केली. सदर तक्रार

Novelty

प्रा. डॉ. सुषमा देशमुख गेली अनेक दिवस
गंभीर स्वरूपाची असुन प्राचार्य, विवाहित महिला वर्ग, इतर पुरुष
महाविद्यालयाचे प्राध्यापक वर्ग तसेच अविवाहित प्राध्यापक यांच्या चारित्र्याबद्दल
अत्यंत अशोभनिय वक्तव्ये करत असल्याबद्दल लिहिले आहे
प्राचार्य तसेच प्राध्यापकांचे अनैतिक संबंध आहेत, चतुर्थ श्रेणी
महिला कर्मचाऱ्यांचे प्राध्यापकांशी गैर संबंध आहेत, एका
विवाहित सीएचबी प्राध्यापकाचे दुसऱ्या अविवाहित प्राध्यापिकेशी
संबंध आहेत अश्या प्रकारची अत्यंत हीन दर्जाची वक्तव्ये
केल्याचे या तक्रारीत नोंदविले आहे. शिवाय मी संस्थेची
आजीव सभासद असल्याने माझे कुणी काहीच बिघडवू शकत
नाही अश्या वल्गना करीत प्राध्यापकांच्या संदर्भात अत्यंत
बेताल वक्तव्ये त्यांनी केले असल्याचे या गंभीर तक्रारीमध्ये
नोंदविले आहे, असे प्राचार्यांनी सभेला सांगितले. एवढेच
नाही तर एका विद्यार्थिनीला महाविद्यालयाची वेळ संपल्यावर
फोन करून एका सीएचबी प्राध्यापकाचे चारीत्र्य हनन करणाऱ्या
गोष्टी सांगितल्याचे त्या विद्यार्थिनीने लेखी स्वरूपात कळविले
आहे असेही प्राचार्यांनी सभेस सांगितले.

यावर भाष्य करताना प्राचार्यांनी हा सर्व प्रकार अत्यंत गंभीर
असून या सर्व प्रकरणा संदर्भात दिलेल्या कारणे दाखवा नोटीशीला
प्रा. डॉ. सुषमा देशमुखांनी दिशाभूल करणारी, आरोपांबद्दल केवळ
मान्य नाही असे सांगणारी, तसेच त्यांच्या म्हणण्या सोबत कोण-
तेही सबळ पुरावे न जोडता दिलेल्या आहेत असे सांगुन ही
सर्व उत्तरे सभेमध्ये सादर केली. महिला महाविद्यालय हे मुलींचे
महाविद्यालय असून अत्यंत प्रातिष्ठित पणे कार्य करते व मोठ्या
विश्वासाने पालक येथे आपल्या मुलींना प्रवेशीत करतात. अशा
ठिकाणी एक वरीष्ठ प्राध्यापिका आपल्या सहकाऱ्यांचे अशा प्रकारे
सीएचबी प्राध्यापकां जवळ व विद्यार्थ्यांजवळ चारित्र्य हनन करत
असेल तर महाविद्यालयाची प्रतिष्ठा धोक्यात आणण्याचा हा
प्रकार आहे. या संदर्भात संबंधित प्राध्यापक डॉ. सुषमा देशमुख
यांच्यावर कारवाई करण्या संदर्भात विचारासाठी हा विषय
सभेपुढे ठेवण्यात आल्याचे प्राचार्यांनी सांगितले. सभेतील
सर्वच सदस्यांनी हा प्रकार अतिशय गंभीर व दुर्दैवी असून
यामुळे महाविद्यालयाची प्रतिष्ठा धोक्यात येऊ शकते असे मत

व्यक्त केले. यासंदर्भात निश्चित पणे कारवाई केली जावी असे सर्वांनी एकमताने सांगितले. एवढ्या मोठ्या प्रमाणात कर्मचारी तक्रार देतात व सदर तक्रार एवढ्या गंभीर स्वरूपाची आहे की, याबाबत तातडीने कारवाई करणे अपेक्षीत आहे असे सर्वांनी सांगितले. सभेच्या मा. अध्यक्ष डॉ. माया शिराळकर यांनी त्याआधी ज्यांच्या संदर्भात सदर तक्रार आहे त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी असे सांगीतले. प्राचार्यांनी या संदर्भात डॉ. देशमुख यांना सदर विषय सभेपुढे असल्याने महाविद्यालयात हजर राहण्या बाबत फोन दिले असल्याचे सांगितले. त्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना सभेपुढे आपले म्हणणे मांडण्या करिता बोलाविण्यात आले.

प्रा. डॉ. सुषमा देशमुख या सभेपुढे हजर झाल्यावर मा. अध्यक्ष डॉ. माया शिराळकर यांनी त्यांना त्यांच्या विरुध्द असलेल्या तक्रारी बद्दल विचारणा केली. त्यावर त्यांनी मला आरोप मान्य नाही असे सांगितले. जेष्ठ उपाध्यक्ष डॉ. सुभाष कसबेकर यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांनी तक्रार दिल्यानंतर तुम्ही तुमच्या उत्तरांमध्ये तुमच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ काहीही पुरावे दिलेले नाहीत अशी विचारणा केल्यावर प्रा. डॉ. सुषमा देशमुख उत्तर देऊ शकल्या नाही व पुन्हा पुन्हा मी माझे म्हणणे लिहून दिले आहे असे सांगत राहील्या. उपाध्यक्ष पं. श्री. किशोरजी नवसाळकर यांनी या प्रकारा बद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली व अशा भाषेमध्ये प्राध्यपक पदावरील व्यक्ती कशी काय बोलू शकते याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. या आधी देखील आपल्या संबंधी आपल्याला संस्थेकडून सूचना करण्यात आली होती व तरीही अशा पध्दतीची वक्तव्ये का केलीत असे त्यांनी विचारले व सोबतच एवढ्या मोठ्या संख्येने कर्मचारी आपल्या विरोधात तक्रार करीत आहेत ते सर्वच खोटे बोलत आहेत असे आपणास म्हणायचे आहे काय? असा प्रश्न त्यांनी प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना विचारला. त्यावर माझ्या विरोधात षडयंत्र केले जात आहे असे त्यांनी सभेला सांगीतले, यावर सचिव मा. श्री. निनाद सोमण यांनी या अशा प्रकारच्या आरोपांमुळे या कर्मचाऱ्यांचा कोणता व्यक्तीगत फायदा होणार होता असा प्रश्न विचारला त्यावर प्रा. डॉ. सुषमा देशमुख काहीच बोलू शकल्या नाहीत. प्राचार्यांनी प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांनी कारणे दाखवा नोटीस मध्ये दि. 08/04/23 व 10/04/23 रोजी त्या कोणत्या कामात होत्या व

त्यांनी कुणाशी संपर्क केला नाही अश्या अनावश्यक बाबी लिहील्या असून या दोन तारखांना तक्रार प्राप्त झाली आहे असे कारणे दाखवा नोटीशी मधे लिहीले आहे ज्याचा अर्थ देखील प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना समजला नाही असे सभेला सांगीतले. मुद्देसूद उत्तर न देता दिशाभूल करणारे व अनावश्यक बाबींचा तपशील या वेगवेगळ्या उत्तरांमधे प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांनी दिलेला आहे हे प्राचार्यांनी त्यांची उत्तरे वाचून सभेत सांगीतले.

मंडळ प्रतिनीधी प्रा. रविंद्र खांडेकर यांनी हा सर्व प्रकार अतिशय गंभीर असून महिला महाविद्यालयाकडे संबंध गावात एका अत्यंत प्रतिष्ठित नजरेतून बघितले जाते व त्यामुळे येथील एका प्राध्यापिकेने अश्या पध्दतीने आपल्याच सहकाऱ्या-बद्दल चारित्र्य हनन करणारे आरोप लावणे ही दुर्देवी बाब आहे असे सांगीतले. महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेच्या आड कुणी येत असेल तर संस्थेकडून हे सहन केले जाणार नाही व अशा बाबीं-करिता कडक कारवाई केली जायला हवी असे मत मांडले. सचिव श्री. निनाद सोमण यांनी प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना आपण आपल्यावर कारवाई होणार या भितीपोटी त्यांच्यावर राजकीय वर्तुळातून दबाव आणण्याचा प्रयत्न का केला असे विचारले असता त्यांनी माझे सर्व मार्ग बंद झाल्यामुळे मला कुठेतरी जावे लागेल असे सांगुन आपण राजकीय वर्तुळातून त्यांच्यावरील प्रस्तावित कारवाई टाळण्याकरीता असे कृत्य केले यास कबुली दिली. सभेच्या अध्यक्ष डॉ. माया शिराळकर यांनी प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना विचारणा केली की अश्या अश्लाघ्य भाषेमधे आपण आपल्या सहकाऱ्यांबद्दल बोलता, आपण सोबत काम करणाऱ्या सीएचबींना जीवनातून उठवून टाकीन व संस्थेची सदस्य असल्याने मला कुणी काही करू शकत नाही असे म्हणतात व सर्वात वाईट म्हणजे एका विद्यार्थिनीस फोन करून एका शिक्षकाचे चारित्र्य हनन करता ही बाब किती चूक आहे याचा अंदाज आपणास आहे का ते स्पष्ट करावे. याबाबत देखील प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांनी मी लेखी दिले आहे असे सांगीतले. अशा प्रकारे सभेसमोर उपस्थित राहून प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांनी कोणत्याही प्रकारचे पुरावे सादर केले नाही. विद्यार्थिनीस त्यांनी कॉल केल्याचा पुरावा म्हणजे स्क्रीन

शॉट उपलब्ध असल्याचे सांगितल्या वरही त्यांनी मी विद्यार्थिनीला फोन केला नाही असेच सांगितले. एकंदरीत कारणे दाखवा नोटीशींना त्यांनी दिलेल्या दिशाभूल करणाऱ्या उत्तरांपलीकडे वेगळे काहीही त्यांनी प्रत्यक्ष आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावर देखील सांगितले नाही. कोणत्याही गोष्टीचे वस्तुनिष्ठ व पुराव्या सह उत्तर त्यांनी दिले नाही. त्यानंतर मला यापेक्षा अजून काही सांगायचे नाही असे म्हणाल्यामुळे मा. अध्यक्षांनी प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना सभेतून जाण्यास सांगितले.

एकंदरीत प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांनी केलेल्या अश्लाघ्य वर्तना बाबत व त्यावरून त्यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीशींना दिशाभूल करणारी व वस्तुनिष्ठ नसणारी, सोबत कोणताही पुरावा नसणारी उत्तरे, प्रत्यक्ष सभेमध्ये त्यांनी दिलेली उत्तरे, त्यांनी या संबंध प्रकरणात राजकीय वर्तुळातून दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न व त्याची कबुली, कोणताही ठोस पुरावा न सादर करणे हे बघता त्यांच्या विरुध्द नियमानुसार कडक कारवाई करण्यात यावी असे शिक्षक प्रतिनीधी प्रा. भावना वासनिक, प्रा. डॉ. अंकुश गिरी, व प्रा. डॉ. पल्लवी अंभोरे यांनी आग्रह पूर्वक सांगितले. या तक्रारींवर आमच्या देखील स्वाक्षऱ्या आहेत व डॉ. सुषमा देशमुख यांनी केलेली वक्तव्ये ही आम्हाला मानसिकदृष्ट्या खचविणारी आहेत असे त्यांनी सांगितले.
आयक्यूएसी कोऑर्डीनेटर प्रा. सचिन देशमुख यांनी महाविद्यालयात अनेक वेळा आपात स्थिती मध्ये विद्यार्थिनींना रुग्णालयात भरती करावे लागते, किंवा एनएसएस कॅम्प च्या ग्रामीण भागातून कधी कधी त्यांना अमरावतीला आणावे लागते, तेव्हा गेली अनेक वर्षे विद्यार्थिनींना अशी मदत करताना कोणताही इतर भाव मनात आज पर्यंत आला नाही व त्यांचे बंधु म्हणून सदैव आम्ही मदत करत आलो आहोत परंतु या असल्या आमच्या चारित्र्या वर शिंतोडे उडविणाऱ्या आरोपांमुळे आम्ही व्यथीत झालो आहोत त्यामुळे या असल्या कृत्या बद्दल कडक कारवाई होणे गरजेचे आहे असे सांगितले. प्राचार्यांनी देखील माहिती दिली की, अनेक कर्मचाऱ्यां प्रमाणे, ज्या एका सीएचबी प्राध्यापका बद्दल अत्यंत हीन दर्जाची वक्तव्ये प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांनी अन्य लोकांजवळ व विद्यार्थीनी जवळ केलीत तो प्राध्यापक बरेच वेळेला विद्यार्थिनींना वैद्यकीय गरज भासल्यास अन्य नियमित प्राध्यापकां सोबत अग्रेसर असतो व बरेच वेळा विद्यार्थिनींचे

पालक येई पर्यंत त्यांच्या भावाच्या भुमिके मध्ये अन्य महिला प्राध्यापकां सोबत थांबलेला असतो. प्रा. डॉ. देशमुख यांनी केलेल्या अशा चारित्र्य हननाच्या प्रयत्नांमुळे त्याची मानासिक स्थिती अत्यंत वाईट आहे व त्याबद्दल त्याने एकत्रित तक्रारी सोबतच स्वतंत्र लेखी तक्रार केलेली आहे असे सभेला सांगितले. प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांच्या अशा वक्तव्यांमुळे व इतर कर्मचाऱ्यां-च्या चारित्र्य हनन करण्याच्या प्रयत्नांमुळे महाविद्यालयाचे एकूणच वातावरण गढूळ झाले आहे व अनेक वर्षे जपलेल्या प्रतिष्ठेस धक्का लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे असे मत सभेला उपस्थित सर्वांनीच व्यक्त केले.

प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यावरही त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत, कोणतेही सबळ पुरावे सादर केले नाहीत. उलट त्यांच्या विरुध्द जवळ-पास सर्वच कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे तक्रार केली आहे. प्राप्त झालेल्या तक्रारी, त्यावर देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीशी त्यावर प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांनी कोणताही पुरावा न देता दिलेली अतार्किक व दिशाभुल करणारी उत्तरे, प्रत्यक्ष बाजू मांडण्या-ची संधी दिल्यावरही ठोस काहीही न सांगितल्या किंवा पुरावे सादर न केल्यामुळे या सर्व प्रकारा करीता सर्वानुमते प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना दोषी ठरविण्यात आले. तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा मध्ये या संदर्भात अस्तित्वात असलेल्या ऑर्डीनन्स नं. 24 तसेच ऑर्डीनन्स नं. 122 नुसार character Roll Warning (to be mentioned in service book) व एक पगारवाढ कायम स्वरुपी रोखणे या शिक्षा प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना करण्यात याव्या व भविष्यात पुन्हा असे वर्तन न करण्याबाबत समज देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. सदर शिक्षा कार्यान्वित करण्या करीता महाविद्यालयीन विकास समितीने सर्वानुमते पारीत केलेला हा प्रस्ताव अंतीम मंजुरी करीता नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती च्या कार्यकारिणी कडे पाठविण्यात यावी असे देखील सर्वानुमते ठरले. तसेच ऑर्डीनन्स नं. 122 मधील तरतुदी नुसार सदर शिक्षा कार्यान्वित करण्या आधी प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना सदर शिक्षे संदर्भात त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्या करीता

स्पष्टीकरण मागणारी नोटीस जारी करून सात दिवसांचे आत त्यांच कडून उत्तर मागवावे असे देखील सर्वानुमते ठरले.
ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र 6 :- मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय
(अ) प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांचा वाणिज्य विभाग प्रमुख पदाचा राजीनामा मंजूर करणे व नविन विभाग प्रमुखाची नियुक्ती करणे.
ठराव :- प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांच्या वाणिज्य विभाग प्रमुख पदाचा राजीनामा अर्ज दि. 31/10/2022 रोजी प्राप्त झाला असुन सदर राजीनामा महाविद्यालयीन विकास समितीने मंजुर करावा असे प्राचार्यांनी सांगितले. प्रा. डॉ. सुषमा देशमुख या वाणिज्य विभागात समन्वय ठेवू शकत नाही तसेच त्या विभागातील इतर सर्व प्राध्यापक तसेच CHB प्राध्यापकांना चांगली वागणूक देत नाही त्यामुळे प्राध्यापकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. तसेच प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांच्या विरोधात महाविद्यालयातील बहुतांश कर्मचाऱ्यांच्या गंभिर तक्रारी प्राप्त झाल्या असल्यामुळे अशा परीस्थीतीत त्यांच्या कडे विभाग प्रमुख पद ठेवणे उचीत नाही त्यामुळे त्यांचा राजीनामा त्वरीत मंजुर करण्यात यावा व त्यांच्या जागी त्वरीत त्यांच्या नंतरच्या वरिष्ठ प्राध्यापक डॉ. शालिनी पांडे यांची वाणिज्य विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. प्रा. डॉ. शालिनी पांडे यांना त्वरीत नियुक्ती पत्र द्यावे व प्रा. डॉ. सुषमा देशमुख यांना त्यांच्या कडील विभाग प्रमुख पदाचा कार्यभार विभागातील भौतिक वस्तु, उपकरणे, स्टॉक रजिस्टर इ. सर्व प्रा. डॉ. शालिनी पांडे यांच्या सुपूर्त करण्याचे कळवावे असे देखील सर्वानुमते ठरले.
ठराव सर्वानुमते मंजुर.
(ब) प्रा. सचिन देशमुख यांचा IQAC coordinator पदाचा राजीनामा मंजुर करून त्यांचा जागी नाविन IQAC coordinator ची नियुक्ती करणे.
ठराव :- महाविद्यालयाचे IQAC coordinator प्रा. सचिन देशमुख यांनी दि. 17/02/2023 रोजी आपल्या IQAC coordinator पदाचा राजीनामा दिल्याचे प्राचार्यांनी सभेत सांगितले. प्रा. सचिन देशमुख हे गेल्या 10 वर्षापासून IQAC coordinator

म्हणून काम करीत असुन नॅक-च्या धोरणा नुसार दर तीन वर्षानंतर नव संकल्पना राबविल्या जाणाऱ्या हेतुने coordinator बदलविण्यात यावे असे सांगीतले आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रा. सचिन देशमुख यांचा राजीनामा मंजूर करावा असे सर्वानुमते ठरले तसेच त्यांच्या जागी संगीत विभागातील कार्यरत प्रा. डॉ अंकुश गिरी यांची IQAC coordinator म्हणून नियुक्ती करण्यात यावी तसेच नियुक्ती पत्र देवून कार्यभार हस्तांतरण करून द्यावे असेही सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

(क) गृह अर्थशास्त्र विभागातील CCTV कॅमेरा काढण्याबाबत निर्णय करणे.

ठराव:- प्राचार्यांनी सभेला सांगितले की, महाविद्यालयातील काही महिला प्राध्यापकांनी गृहअर्थशास्त्र विभागातील आतल्या भागातील CCTV कॅमेरा काढण्याची विनंती केली आहे. कारण काही प्रसंगी प्रायव्हसी मिळण्याच्या दृष्टीने एखादी जागा महाविद्यालयात असावी असे त्यांना वाटते आहे. सदर मागणीवर विचार करून उल्लेखित CCTV कॅमेरा काढण्यात यावा व तो कॅमेरा वाणिज्य विभाग प्रमुखांच्या कक्षात लावण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

(ड) विविध प्रयोग शाळा सहाय्यकांच्या पगार वाढीच्या अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव:- महाविद्यालयात वेगवेगळ्या प्रयोग शाळा मध्ये व विभागा मध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी सहाय्यकांनी पगार वाढीची विनंती करणारे अर्ज प्राचार्यांनी सभेपुढे सादर केले. सदर सर्व अर्ज विचारास्तव नू.वि.शि.मं.च्या कार्यकारीणीकडे पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

(इ) B.Voc या अभ्यास क्रमाच्या बदलत्या स्वरूपा बद्दल चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव:- प्राचार्यांनी सभेस अवगत करून दिले की, महाविद्यालयात सुरु असलेल्या B.Voc या अभ्यास क्रमाचे स्वरूप बदलणार आहे. यामध्ये आता यापुढे विद्यापीठ सोबतच सेक्टर स्किल कौंसिलचे नाव व लोगो डिग्रीवर दिला जाणार आहे. ज्यामुळे

Novelty

सदर डिग्रीस वेगळे महत्व प्राप्त होईल परंतु असे केल्यास अभ्यास क्रमाच्या फी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल त्यामुळे या बद्दल निर्णय करावा लागेल. या विषयावर चर्चा करण्यात आली व निर्णय घेण्या करीता सदर विषय नू.वि.शि.मं. च्या कार्यकारीणीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

(फ) प्रा. डॉ. अरुणा वाडेकर व प्रा. डॉ. अंकुश गिरी यांचे अभिनंदन करणे

ठराव:- वाणिज्य विभागात कार्यरत डॉ. अरूणा वाडेकर तसेच संगीत विभागात कार्यरत डॉ. अंकुश गिरी या दोघांची त्यांच्या विषयांच्या विद्यापीठ अभ्यास मंडळावर नियुक्ती झाल्या बद्दल सभेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

PRINCIPAL
MAHILA MAHAVIDYALAYA
AMRAVATI.

President
Nootan Vidarbha Shikshan Mandal
AMRAVATI

महिला महाविद्यालय अमरावती.
महाविद्यालयीन विकास समिती सभा.
दिनांक: 18.07.2022
स्थळ: महिला महाविद्यालय, अमरावती.

महिला महाविद्यालय, अमरावती. येथील - महाविद्यालयीन विकास समितीची सभा-सत्र: 2022-23 मधील सभा दि. 18.07.2022 रोजी दुपारी: 3:30, वाजता महाविद्यालयात आयोजित करण्यात आली.
सभेला खालील सन्माननिय सभासद उपस्थित होते.

01) डॉ. माया वि. शिरभाळकर,
मा. अध्यक्ष: न्यू. वि. शि. मंडळ, अमरावती.

02) डॉ. सुभाष र. कसबेकर.
मा. ज्येष्ठ उपाध्यक्ष: न्यू. वि. शि. मं. अम...

03) श्री. विश्वनाथ दि. जोशी.
मा. उपाध्यक्ष: न्यू. वि. शि. मं. अम...

04) मा. पं. किशोर वि. नवसाळकर,
मा. उपाध्यक्ष: न्यू. वि. शि. मं. अम...

05) मा. प्रा. श्री. निनाद वा. सोमण.
मा. सचिव: न्यू. वि. शि. मं. अम...

06) मा. श्री. रविंद्र ग. खांडेकर,
मा. मंडळ प्रतिनिधी: न्यू. वि. शि. मं. अम...

07) मा. प्रा. डॉ. विनया कांत.
मा. प्रतिनिधी (माजी विद्यार्थीनी) म. म. वि. अम...

08) प्रा. डॉ. सुषमा एस. देशमुख.
मा. सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती: म. म. वि. अम...

09) प्रा. सचिन एस. देशमुख
मा. सदस्य: महाविद्यालयीन विकाससमिती. म. म. वि. अम...

10) प्रा. बी. बी. वासनिक.
शिक्षक प्रतिनिधी: महाविद्यालयीन विकास समिती. म.म.वि.अम..

11) प्रा. डॉ. अंकुश ए. शिंदी.
शिक्षक प्रतिनिधी: महाविद्यालयीन विकास समिती. म.म.वि.अम...

12) प्रा. डॉ. पल्लवी एस. अंभोरे.
शिक्षक प्रतिनिधी: महाविद्यालयीन विकास समिती. म.म.वि.अम...

13) श्री. मिलींद पंत.
शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी: महाविद्यालयीन विकास समिती-
म.म.वि. अमरावती.

14) कु. प्रिती पांडे.
विद्यार्थी प्रतिनिधी: महाविद्यालयीन विकास समिती-
म.म.वि. अमरावती.

15) कु. निकीता मोने.
विद्यार्थी प्रतिनिधी: महाविद्यालयीन विकास समिती-
म.म.वि. अमरावती.

16) प्राचार्य: डॉ. अविनाश भा. मोहरील.
मा. सदस्य/मा. सचिव: महाविद्यालयीन विकास समिती-
म.म.वि. अमरावती.

# महाविद्यालयीन विकास समिती सभा
दि. १८/०७/२०२२

## — इतिवृत्त —

महिला महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन विकास समितीची सभा दि. 18/07/2022 रोजी दुपारी 3.30 वाजता प्राचार्य कक्षामध्ये आयोजित करण्यात आली. या सभेला अध्यक्ष म्हणून संस्थेचे जेष्ठ उपाध्यक्ष मा. डॉ. श्री. सुभाष कसबेकर तसेच इतर सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

सभेचे कार्यवृत्त खालील प्रमाणे

विषय क्र. 1 - मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजुर करणे.
ठराव :- महाविद्यालयाच्या विकास समितीची सभा दि. 07/01/22 रोजी आयोजित करण्यात आली होती, त्या सभेचे इतिवृत्त प्राचार्यांनी सभेमध्ये सादर केले. सदर इतिवृत्तामध्ये सभेतील सर्व बाबी योग्य पध्दतीने नोंदविल्यामुळे सदर इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.
ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. 2 - मागील सभेच्या निर्णयावरील कार्यपालन अहवालास मंजुरी प्रदान करणे.
ठराव :- दि. 07/01/2022 रोजी झालेल्या सभेतील निर्णयावरील कार्यपालन अहवाल प्राचार्यांनी सभेत सादर केला. सदर कार्यपालनाबाबत सर्व सभासदांनी सविस्तर चर्चा केली. व कार्यपालन संदर्भात समाधान व्यक्त केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या सत्र 2018-2019 पासुनच्या थकीत शिष्यवृत्ती संबंधीत माहिती देताना प्राचार्यांनी सभेस अवगत केले की, थकीत शिष्यवृत्ती जमा होत असुन आता पर्यंत खालील प्रमाणे रक्कम प्राप्त झाली आहे.

| सत्र | प्राप्त रक्कम |
|---|---|
| 2018-2019 | 24,682/- |
| 2019-2020 | 45,534/- |
| 2020-2021 | 50,426/- |
| एकुण रक्कम प्राप्त | 1,20,642/- |

या विषया सह अन्य कार्यपालना सविस्तर चर्चा करण्यात आली व सर्वानुमते कार्यपालन अहवाल मंजुर करण्यात आला.
ठराव सर्वानुमते मंजुर

यानंतर विषय पत्रिकेवरील विषय क्र ३ ऐवजी विषय क्र.४ चर्चेस घेण्याची परवानगी प्राचार्यांनी मा. अध्यक्षांकडे मागीतली. मा. अध्यक्षांनी परवानगी दिल्यानंतर विषय क्र. ४ चर्चेसाठी घेण्यात आला.

विषय क्र. ४ - शैक्षणिक वर्ष 2022-2023 अंदाज पत्रकास मंजुरी प्रदान करणे.

ठराव:- शैक्षणिक सत्र 2022-2023 चे अंदाज पत्रक सभेपुढे सादर करण्यात आले. या मध्ये महाविद्यालयाच्या विविध खात्यांमध्ये प्राप्त होणारी अंदाजे जमा रक्कम व सदर खात्यातुन केल्या जाणाऱ्या अंदाजित खर्चाचा लेखाजोखा सादर करण्यात आला. यामध्ये सर्व खात्यांची मिळुन एकूण अंदाजे रक्कम 92,03,852/- एवढी तर एकूण अंदाजे खर्च 92,92,288/- दाखविण्यात आला. सदर अंदाज पत्रकावर सविस्तर चर्चा करण्यात आली. हे अंदाज पत्रक तयार करतांना संस्थेचे सचिव मा. श्री. निनाद सोमण यांचे मोठे मार्गदर्शन लाभले, असे प्राचार्यांनी सांगीतले. सविस्तर चर्चेनंतर शैक्षणिक सत्र 2022-2023 करीता सादर करण्यात आलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी प्रदान करण्यात आली. तसेच पालक संस्थेद्वारे या पूर्वीच देण्यात आलेल्या आदेशानुसार रूपये 10,000/- वरील खर्च करीता संस्थेच्या कार्यकारीणीची मंजुरी घ्यावी असे सांगण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र: ३ आकस्मिक उद्‌भवणाऱ्या तसेच नियमित खर्चांना मंजुरी प्रदान करणे.

ठराव:- महाविद्यालया मध्ये नॅक मुल्यांकना करीता पिअर टीम भेट देणार असुन त्या अनुषंगाने खालील प्रमाणे काही खर्च अपेक्षित आहे, असे प्राचार्यांनी सभेला सांगीतले तसेच इतर काही कामांकरीता खर्चाची रक्कम मंजुर करावी अशी देखील विनंती प्राचार्यांनी सभेला केली,

1) नॅक मुल्यांकनाच्या पिअर टीम भेटी करीता अतिरीक्त रक्कम (गाड्यांचा खर्च, जेवणाचा खर्च व इतर आदरातिथ्य खर्च) 1,00,000/- (रु एक लक्ष)

2) नॅक पिअर टीम visit दरम्यान लागणारा आकस्मिक खर्च रू. 50,000/- (रू. पन्नास हजार)
3) संगीत रिसर्च सेंटर करीता खुर्च्या व टेबल खरेदी करण्याचा खर्च रू. 20,000/- (रू. वीस हजार)
4) Ph. D. रिसर्च सेंटर द्वारे चालविल्या जाणाऱ्या कोर्स वर्क करीता zoom या online platformचे वार्षिक सदस्यत्व रू. 13,200/- (रू. तेरा हजार दोनशे)
5) प्राचार्य कक्षा मध्ये असलेल्या ट्रॉफीज व सन्मान चिन्हे ठेवण्यासाठी शोकेश बनविण्याचा खर्च रू. 15,000/- (रू. पंधरा हजार)

वर नोंदविलेले सर्व खर्च मागील वर्षाच्या मंजुर बजेट नुसार महाविद्यालयाच्या विविध खात्यां मध्ये असलेल्या रकमेतुन करता येतील असे प्राचार्यांनी सभेला सांगीतले. सदर खर्चा बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. व हे सर्व खर्च आवश्यक असल्यामुळे त्यास मंजुरी करण्यात आली. तसेच या सर्व खर्चास नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या कार्यकारीणी कडून अंतिम मंजुरी घेण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. या विषया अंतर्गत संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष मा. पं. किशोरजी नवसाळकर यांनी महाविद्यालयाच्या नवीन प्रेक्षागृहा मध्ये वातानुकुलीत यंत्रणा बसविण्यात यावी, असा प्रस्ताव मांडला. संस्थेचे जेष्ठ उपाध्यक्ष व सभेचे अध्यक्ष मा. डॉ. सुभाष कसबेकर यांनी या प्रस्तावास दुजोरा देऊन प्रेक्षागृहा मध्ये वातानुकुलीत यंत्रणे सोबतच ॲकॉस्टिक्स देखील करून घेण्यात यावे, असे सुचविले. सदर प्रस्तावा बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या संदर्भात प्राचार्यांनी सभेला सांगीतले की तज्ञां कडून माहिती घेतली असता वातानुकुलीत यंत्रणे करीता अंदाजे रू. 3,00,000/- व ॲकॉस्टिक्स अंदाजे 2,00,000/- एकूण रू. 5,00,000/- खर्च लागु शकतो.

सदर कामांकरीता मोठी रक्कम लागणार असल्याने सदर प्रस्ताव नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या कार्यकारीणी कडे विचारास्तव पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र. 5 - नॅक मुल्यांकन प्रक्रियेचा आढावा घेणे.
ठराव:- नॅक मुल्यांकनाच्या प्रक्रियेची विस्तृत माहिती प्राचार्यांनी सभेला दिली. मुल्यांकनाच्या मानकानुसार महाविद्यालयाचा

SSR ( सेल्फ स्टडी रिपोर्ट) मंजुर झाला असुन पुढील टप्प्यातील DVV प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले या सोबतच वेगवेगळ्या विभांगा मध्ये प्रत्यक्ष भेटीच्या अनुषंगाने Documentation त्याच्या फाईल तयार करणे व प्रेझेन्टेशन चे काम सुरू आहे. सदर प्रेझेन्टेशन IQAC कडून तपासले जात असुन त्यास अंतिम मंजुरी प्राचार्यांकडून तपासणी करून दिली जात आहे. विभागा सोबतच प्राचार्यांचे सादरीकरण, IQAC, ग्रंथालय, कार्यालय व इतर उपक्रमांचे देखील सादरीकरण तयार करणे सुरू आहे. DVV प्रक्रिये नंतर नॅक कडून मागितलया जाणाऱ्या कागद पत्रांची त्वरीत पुर्तता करण्यात येईल व त्यानंतर उर्वरीत फी भरून पिअर टीमच्या भेटी ~~च्या~~ करीता नॅक कडून तारीख कळविण्यात येईल. या सोबतच पिअर टीम भेटीच्या वेळी होणाऱ्या विद्यार्थी सभा, पालक सभा, व माजी विद्यार्थींनी सभा यांची देखील तयारी गट निहाय केली जात आहे. या सर्व गटांशी प्राचार्य व IQAC Co-ordinator सतत संपर्क करून तयारी करून घेत आहे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी नॅक मुल्यांकनाच्या प्रक्रिये करीता भरपूर परीश्रम घेत आहे. त्यांना IQAC समन्वय प्राध्यापक सचिन देशमुख तसेच IQAC च्या इतर सदस्यांचे मार्गदर्शन लाभत आहे, असे प्राचार्यांनी सांगीतले. तसेच या प्रक्रिये दरम्यान संस्थेच्या कार्यकारीणी कडून भक्कम पाठबळ दिले जात आहे. व आवश्यक त्या भौतिक सुविधा निर्माणाचेकार्य निरंतर सुरू आहे, असे प्राचार्यांनी सभेला सांगितले. संस्थेचे मा. सचिव निनाद सोमण हे प्रत्यक्ष भेट देऊन सर्व भौतिक सुविधा उभारण्यामध्ये मोलाची मदत करीत आहेत असे प्राचार्यांनी सभेला सांगितले. नॅक मुल्यांकनाच्या प्रक्रीये करीता केल्या जाणाऱ्या तयारी बाबत सर्व सभासदांनी समाधान व्यक्त केले. तसेच सदर मुल्यांकन प्रक्रिया चांगल्या प्रकारे पार पडल्या जाईल असा विश्वास व्यक्त केला.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र. 6 - अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमां-करीता अनुक्रमे CHB व Contract Basis Teacher

नेमण्याची परवानगी घेणे.

ठराव:- महाविद्यालयात चालविणा-या अनुदानित अभ्यासक्रमामध्ये काही विषयांकरीता पूर्णवेळ शिक्षक नसल्यामुळे तसेच काही विषयांमध्ये अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे CHB प्राध्यापकांची नेमणूक करावयाची आहे. अनुदानित अभ्यासक्रमांकरीता खालील प्रमाणे CHB प्राध्यापकांच्या रिक्त जागा आहेत ज्यास मा. सहसंचालकांची परवानगी प्राप्त आहे. सदर पदांचा तपशील खाली प्रमाणे आहे.

अनुदानित अभ्यासक्रम

| विषय/ विभाग | CHB रिक्त पदे |
|---|---|
| बी. कॉम (मराठी) | 2 |
| मराठी | 2 |
| अर्थशास्त्र | 2 |
| भुगोल | 2 |
| संस्कृत | 2 |
| इंग्रजी | 2 |
| गृहअर्थशास्त्र | 4 |
| संगीत | 6 |

त्याच प्रमाणे महाविद्यालयात चालविणा-या विनाअनुदानित अभ्यासक्रमांकरीता Contract Basis Teacher नेमायचे आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

विनाअनुदानित अभ्यासक्रम.

| विषय/ विभाग | पदसंख्या |
|---|---|
| बी. कॉम (इंग्रजी) | |
| Commerce | 3 |
| इंग्रजी | 1 |
| मराठी | 1 |
| हिंदी | 1 |
| एम. कॉम | 5 |
| बी. व्होक - | |
| Accounting | 3 |
| Fashion Tech. | 3 |
| Computer | 1 |
| इंग्रजी | 1 |
| एम. ए. संगीत | 2 |

| | |
|---|---|
| एम.ए. गृहअर्थशास्त्र | 4 |
| ECCE | 1 |
| पर्यावरण शास्त्र | 1 |

वरील सर्व पदे त्वरीत भरणे गरजेचे असल्याने सदर प्रक्रीयेस मंजुरी प्रदान करण्यात यावी अशी विनंती प्राचार्यांनी सभेला केली. या विषयांवर सविस्तर चर्चा होऊन ही पदे भरती करण्याची सर्वानुमते परवानगी प्रदान करण्यात आली.
ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र. 7 - मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

अ) महाविद्यालयात करण्यात आलेल्या विविध भौतिक सुविधा व तसेच विकासात्मक कामांची माहिती देणे.
महाविद्यालयांत लवकरच होणाऱ्या नॅक मुल्यांकन प्रक्रियेच्या अनुषंगाने विविध भौतिक सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत, ज्या मध्ये महत्वाच्या सर्व ठिकाणी रंगकाम झाले आहे, विद्युत पुरवठ्याच्या वारंवार होणाऱ्या त्रासातुन मुक्तता होण्या साठी तीन स्वतंत्र फेजचे इलेक्ट्रीक फिटींग करण्यात आले. गृहअर्थशास्त्र विभागाच्या मागील बाजुला महिलां करीता स्वतंत्र व नवीन प्रसाधन गृह बांधण्यात आलेले आहे. बी.व्होक Fashion Technology या अभ्यासक्रमा करीता नविन अत्याधुनिक शिलाई मशीन्स विकत घेण्यात आल्या आहेत, एकंदरीत संस्थेच्या कार्यकारीणीच्या पाठबळ व सहकार्यामुळे महाविद्यालयात अनेक भौतिक सुविधा निर्माण होत आहे, असे प्राचार्यांनी सांगीतले व त्यामुळे त्यांनी सर्वांच्या वतीने सर्व कार्यकारीणी सभासदांचे आभार मानले. या प्रसंगी संस्थेचे सचिव मा. श्री. निनाद सोमण यांनी उर्वरीत सर्व भौतिक सुविधा माननीय कार्यकारीणीच्या मार्गदर्शना मध्ये लवकरच पुर्ण करण्यात येतील असा विश्वास दर्शविला.
ठराव सर्वानुमते मंजुर.

ब) Stock verification करीता समिती गठीत करणे. तसेच विविध विभागातील वस्तु/उपकरणे निरस्त करण्यास

परवानगी घेणे.
ठराव:- संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष पं. श्री. किशोरजी नवसाळकर यांच्या सुचनेनुसार सर्व विभागाच्या stock-verification करीता आपापसात समित्या तयार करण्यात याव्या. व एका विभागाच्या प्राध्यापकांनी दुसऱ्या विभागाचे stock verification करावे असे ठरविण्यात आले. तसेच प्रत्येक विभाग प्रमुखाने आपल्या विभागातील निकामी झालेल्या वस्तुंची/उपकरणांची यादी बनवून सदर वस्तु/उपकरणे निरस्त करण्याकरीता लेखी स्वरुपात परवानगी घ्यावी असे देखील ठरले. सदर प्रक्रियेची लगेच अंमलबजावणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.
ठराव सर्वानुमते मंजुर.

क) काही कर्मचाऱ्यांच्या पगार वाढीच्या अर्जावर तसेच काही प्रयोग शाळा सहायकांना जून महिन्याचा पगार देण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.
ठराव:- महाविद्यालयांत कार्यरत शिक्षकेतर कर्मचारी अथर्व पहाडे व अमोल बिंड यांनी पगार वाढ करण्यात यावी असे अर्ज दिले आहे, असे प्राचार्यांनी सभेत सांगितले. सदर कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक असुन त्यांना गेली दोन वर्ष पगार वाढ दिलेली नसल्यामुळे त्यांच्या अर्जावर विचार करावा अशी विनंती प्राचार्यांनी सभेला केली. यावर झालेल्या चर्चेअंती दोन्ही ही कर्मचाऱ्यांना ऑगस्ट पेड इन सप्टेंबर पासुन प्रती महिना रु. 1000/- एवढी पगार वाढ देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. तसेच महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यकांनी जुन महिन्यात सुट्टी असतांना देखील पुर्णवेळ काम केले असल्यामुळे सदर महिन्याच्या पगाराची मागणी केली असल्याने प्राचार्यांनी सभेला सांगितले. अस्थायी कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा खंड द्यावा लागत असल्यामुळे सदर पगार देता येणार नाही, असे प्राचार्यांनी सांगितले. परंतु त्यांना बोनस देण्या संबंधीच्या विचार केला जावा अशी विनंती सभेला केली. यावर संस्थेचे सचिव मा. श्री. निनाद सोमण यांनी संबंधित सहाय्यकांना बोनस दिला जावा. व सदर बोनस संस्थेकडून दिला जाऊ शकतो असे सांगितले. या प्रस्तावास सर्व सभासदांनी दुजोरा दिला, व माननीय कार्यकारणीच्या परवानगी नंतर बोनस दिला जावा

असे सर्वानुमते ठरले.
ठराव सर्वानुमते मंजुर.
यानंतर सभे पुढील सर्व विषय संपल्यामुळे प्राचार्यांनी सभेचे अध्यक्ष तसेच सर्व सभासदांचे सभेला उपस्थित राहून कामकाजामध्ये सहभाग घेतल्या बद्दल आभार मानले. व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्तीची घोषणा केली.

Principal
Mahila Mahavidyalaya
Amravati

President
Nootan Vidarbha Shikshan Mandal
AMRAVATI